**प्रेसनोट दिनांक:- २३/०८/२०१९**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

---

**दुकानात कामास असलेल्या कामगाराने ८५०००/- चोरून नेले. चोरटयास बंडगार्डन पोलीस स्टेशन च्या पोलीसांनी कानपूर, उत्तर प्रदेश येथे जावून केले जेरबंद**

ताडीवाला रोड परिसरातील कुमार पिनॅकल बिल्डींगमधील दुकानात काम करणाऱ्या नोकराने दुकानात ठेवलेले ८५०००/- रूपये घेवून पोबारा केला. दुकानदार फिरोज सिद्दीकी यांचे लक्षात ही बाब आल्यानंतर त्यांनी बंडगार्डन पोलीस स्टेशनला तक्रार दिली. त्यावेळी सद्दाम अली हुसेन हा दुकानात येत नाही असे लक्षात आले. त्याचेबाबत त्याचे नांव व पत्ता कानपुर इतकीच माहिती मिळाली. सुमारे ८ महिन्यापासुन फरारी असलेला आरोपी सद्दाम अली हुसेन हा कानपुर येथे त्याचे गांवी असल्याची माहिती सपोनि अमोल काळे यांना मिळाल्याने, बंडगार्डन पोलीस स्टेशनकडील पोलीस हवालदार नवनाथ डांगे व पोलीस शिपाई प्रकाश सावंत असे दोघांना रवाना करण्यात आले. कानपुर, उत्तर प्रदेश येथे शोध घेतला असता, सद्दाम अली हुसेन हा कानपूर मधील मनोहरनगर येथे मिळून आल्याने पोलीसांनी त्यास ताब्यात घेवून, पुणे येथे आणले.

सदरची चांगली कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक अमोल काळे, पोलीस हवालदार नवनाथ डांगे व पोलीस शिपाई प्रकाश सावंत यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**बंडगार्डन पोलीस स्टेशन पुणे शहर**